डोंबिवली प्रोग्रेसिव्हज, ठाणे संचलित ग्रीन्स इंग्लीश स्कूल, डोंबिवली (पूर्व), कृष्ण निवास, डॉ.ओक हॉस्पीटलसमोर, चिपळूणकर पथ, रामनगर, ता.कल्याण, जि.ठाणे या शाळेच्या, प्लॉट नं.१३, मिलापनगर, एम.आय.डी.सी.,डोंबिवली (पूर्व), जि.ठाणे येथील स्थलांतरास कार्योत्तर मान्यतेबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः प्राशास्थ ३२१९/प्र.क्र.४२१/एसएम-१
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : १३ जून, २०१९

वाचा :-

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांकः माशास्थ २०१२/(५९/१२)माशि-२, दिनांक ३१ जुलै, २०१३.

संदर्भ :- विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई यांचे क्र.शिउसं/माध्य-२/स्थलांतर/६४९/२०१७/४४०-४१, दिनांक ११ एप्रिल, २०१९ चे पत्र.

प्रस्तावना :-

डोंबिवली प्रोग्रेसिव्हज, ठाणे संचलित ग्रीन्स इंग्लीश स्कूल, डोंबिवली (पूर्व), कृष्ण निवास, डॉ.ओक हॉस्पीटलसमोर, चिपळूणकर पथ, रामनगर, ता.कल्याण, जि.ठाणे या इंग्रजी माध्यमाच्या कायम विनाअनुदानित प्राथमिक, उच्च प्राथमिक व माध्यमिक शाळेचे, प्लॉट नं.१३, मिलापनगर, एम.आय.डी.सी.,डोंबिवली (पूर्व), जि.ठाणे येथील स्थलांतरास कार्योत्तर मान्यता देण्याचा संदर्भाधीन पत्रान्वये प्राप्त झालेला प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :-

उपरोक्त शाळेची इमारत धोकादायक झाल्याने डोंबिवली महानगरपालिकेने इमारत रिकामी करण्यासाठी नोटीस बजावल्याने व विद्यार्थी सुरक्षितेच्या कारणास्तव संस्थेला महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने लीजकराराने दिलेल्या जागेवर बांधलेल्या इमारतीत सन २००५ मध्ये शाळेचे स्थलांतर केले आहे. सदर शाळेच्या वर नमूद ठिकाणी केलेल्या स्थलांतरास खालील अटी व शर्तीवर मान्यता देण्यात येत आहे :-

(१) स्थलांतराबाबत संस्थेकडून विहित शुल्क घेण्यात यावे.
(२) सर्व पात्रताधारक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना स्थलांतरित ठिकाणी सामावून घेण्यात आले आहे व त्यांच्या सेवाशर्तीमध्ये बदल करण्यात आलेले नाही, याबाबत खात्री करणे आवश्यक राहील.
(३) स्थलांतरीत शाळेची किमान पटसंख्येची अट कोणत्याही कारणास्तव शिथिल केली जाणार नाही.
(४) शासनाकडून शाळा, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, वेतन/वेतनेतर अनुदान, विद्यार्थी इ.संदर्भात वेळोवेळी विहित करण्यात येणारे अधिनियम, नियम, आदेश इ.चे पालन संस्थेने करणे आवश्यक राहील.
(५) स्थलांतरीत शाळेच्या बाबतीत मुळ शासन परवानगीच्या व मान्यतेच्या कोणत्याही अटी व शर्तीमध्ये बदल होणार नाहीत.
(६) सदर शाळा मुळ ठिकाणी अनुदानाच्या ज्या तत्वावर कार्यरत होती, त्याच तत्वावर स्थलांतरीत ठिकाणी कार्यरत राहील.

(७) सदर शाळा ही इंग्रजी माध्यमाची कायम विनाअनुदानित तत्वावरील असल्याने त्यामध्ये कार्यरत शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी यांचे संपूर्ण दायित्व संस्थेवर राहील.

(८) सदरहू स्थलांतरासंदर्भात शासनाकडे अथवा शिक्षण विभागाच्या क्षेत्रिय अधिकाऱ्यांकडे कोणत्याही प्रकारच्या तक्रारी वा आक्षेप आल्यास किंवा स्थलांतरासंदर्भातील अटींचा भंग झाल्याचे निदर्शनास आल्यास स्थलांतर रद्द करण्याचे अधिकार शासनास राहतील.

(९) यापूढे शाळेचे शासनाच्या पूर्वमान्यतेशिवाय स्थलांतर करण्यात येणार नाही, याबाबत दक्षता घेण्याबाबत संस्थेस स्पष्ट करण्यात यावे.

२. वरील अट क्र.(१) व (२) ची पूर्तता झाल्यावर, विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई विभाग, मुंबई यांनी सदर शाळेच्या स्थलांतरास मान्यता देण्याबाबत पुढील आवश्यक कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीबाबत शासनास अवगत करावे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०६१३१५०९४९०७२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Pravin Rajaram Mundhe

Digitally signed by Pravin Rajaram Mundhe
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8cc298cb2ba38f035e6bd1a51789c7ed1ed4f4fce865eda3495969f77d97c89a, cn=Pravin Rajaram Mundhe
Date: 2019.06.13 14:57:23 +05'30'

(प्रविण मुंढे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत -

१) शिक्षण संचालक (प्राथमिक/माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
२) विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई विभाग, मुंबई.
३) शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), जिल्हा परिषद, ठाणे.
४) अध्यक्ष/ सचिव, डोंबिवली प्रोग्रेसिव्हज, ठाणे.
५) निवडनस्ती (एसएम-१).